# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## जाहिर प्रगटन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रात शैक्षणिक वर्ष २०१२–१३ करिता नवीन महाविद्यालये व संलग्नित महाविद्यालयांसाठी अभ्यासक्रम/विषय/विद्याशाखा/तुकडी /नैसर्गिक वाढ/ संलग्निकरणाचे नूतनीकरण/ कायम संलग्निकरण इत्यादीसाठी सादर करावयाचे विहीत नमुन्यातील आवेदनपत्र / प्रस्ताव, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३०/१०/२०१० च्या निर्णय सर्व परिशिष्टां सह आणि विद्यापीठाचा बृहत आराखडा ( Prespective Plan 2012-13 ) विद्यापीठाच्या प्रकाशन विभागात दि. ०१ ऑक्टोबर २०११ पासून विक्रीस उपलब्ध करून देण्यात येत आहेत. संबंधीत आवेदनपत्र / प्रस्ताव, परिशिष्ट 'अ' सह पूर्णपणे भरून विहीत शुल्कासह व परिशिष्ट 'ब' नुसार आवश्यक सर्व कागदपत्रे प्रत्येक प्रस्तावास क्रमाने लावून विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ८२ (३) अन्वये ३१ ऑक्टोबर २०११ अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दि. ३०/१०/२०१० च्या निर्णयानुसार व विद्यापीठ अनुदान आयोग ( विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण ) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदीनुसार व बृहत आराखडयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संलग्निकरणाची मागणी करण्यापूर्वी आवश्यक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि इतर इमारती, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांची उपलब्धता, वीज, पाणी, स्वच्छतागृह इत्यांदींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था इत्यादी सर्व बाबींची उपलब्धता असणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन महाविद्यालयासाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी. त्याच प्रमाणे संपूर्ण प्रस्तावाची आणि संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाचे छायाचित्रण अथवा व्हिडीओ शुटींग करून त्याची सी.डी. प्रस्तावाच्या प्रत्येक प्रतीसोबत जोडण्यात यावी. परिशिष्ट 'ब' नुसार आवश्यक सर्व कागदपत्रे प्रत्येक प्रस्तावासोबत सादर केलेल्या संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयासाठी परिशिष्ट 'क' नुसार तपासणी करण्यासाठी समिती पाठविण्यात येईल.

दि. २६/०९/२०११
नांदेड

स्वा/–
कुलसचिव